**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७६/२०१८** **दिनांक २१/०९/२०१८** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १७/०९/२०१८ ते २१/०९/२०१८) | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २२/०९/२०१८ सकाळी ८:३० पासून २६/०९/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१७/०९** | **१८/०९** | **१९/०९** | **२०/०९** | **२१/०९** | | **२२/०९** | **२३/०९** | **२४/०९** | **२५/०९** | **२६/०९** |
| ० | ० | ० | ० | ० | **पाऊस (मिमी)** | १९ | ५५ | ६ | ८ | ७ |
| ३१.० | ३१.० | ३१.० | ३०.० | ३२.० | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३१ | ३१ | ३२ | ३२ |
| २३.२ | २२.४ | २४ | २४.४ | २५.० | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २४ | २४ | २४ | २४ |
| - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ७ | ८ | ७ | २ | १ |
| ८३ | ८७ | ८० | ९३ | ९३ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८२ | ८३ | ८३ | ८२ | ८२ |
| ६७ | ६५ | ७८ | ६८ | ७० | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७१ | ७२ | ७२ | ७२ | ७२ |
| - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ११ | १२ | ८ | ६ | ३ |
| - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै. | नै. | द. | द. | आ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | **२३५९.६** | २८३४.२ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २२ ते २६ सप्टेंबर २०१८ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक २२ ते २४ सप्टेंबर २०१८ पर्यंत आकाश मेघाच्छादित आणि २५ व २६ रोजी अंशतः मेघाच्छादित राहील. दिनांक २२ ते २६ सप्टेंबर २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ३ ते १२ किमी प्रति तास राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | फुलोरा ते दाणे भरण्याची अवस्था | • निम गरवा व गरवा भात पसवण्याच्या अवस्थेत असल्याने भात पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. हळवे भात पक्व होऊ लागल्यास शेतातील पाणी काढून टाकावे.<br>• पिवळ्या खोडकिडीच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन २.५ टक्के प्रवाही ६ मिली प्रति १० लिटर. पाण्यातून फवारावे.<br>• करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी ट्रायसायक्लोझोल ७५ % पा. मि. भुकटी ६ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यातून फवारावे. |
| आंबा | पालवी | • १-२ वर्षे वयाच्या आंबा कलमाच्या नवीन येणाऱ्या पालवीवर शेंडे पोखरण्याऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्यास कीडग्रस्त पालवी अळीसहित नष्ट करावी व क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा मोनोक्रोटोफस ३६ टक्के प्रवाही ११ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| चिकू | फळधारणा | • चिकू फळातील बी पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी बागेतील कीडग्रस्त तसेच गळलेली फळे व पालापाचोळा गोळा करून जाळून नष्ट करावा. |
| केळी | -- | • केळी पिकामध्ये पर्णगुच्छ रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास रोगग्रस्त झाडे मुनव्यासकट जमिनीतून समूळ उपटून नष्ट करावीत. |
| फळबाग रोपवाटिका | -- | • पाण्याच्या उपलब्धतेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**